# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 09.01.2025** **वार-गुरुवार**

---

**मिलेट महोत्सव**

शेतकऱ्यांनी पिकवलेल्या तृणधान्याला योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देण्याची जबाबदारी पणन विभागाची आहे, असं प्रतिपादन पणनमंत्री जयकुमार रावल यांनी आज पुण्यात केलं. गणेश कला क्रिडा मंच इथं पणन मंडळाच्या वतीने आयोजित तृणधान्य महोत्सवाचं उद्घाटन रावल यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते. प्रदर्शनातील विविध दालनांना त्यांनी भेट दिली. तृणधान्य जनजागृतीसाठी काढण्यात आलेल्या दुचाकी फेरीलाही रावल यांनी हिरवा झेंडा दाखवला. राज्याच्या विविध भागातून तृणधान्य उत्पादक, प्रक्रिया उद्योगामध्ये कार्यरत असणारे बचतगट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्ट अप कंपन्या यात सहभागी झाल्या आहेत. हा महोत्सव १२ जानेवारीपर्यंत सुरू राहणार आहे.

**अजित पवार**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी, तीन स्तरावर चौकशी सुरू असून, जे कोणी दोषी असतील, त्यांना सोडलं जाणार नाही, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज पुण्यात पत्रकारांशी बोलतांना सांगितलं. या प्रकरणात वरिष्ठ पातळीवरील कोणीही दोषी आढळलं तर त्यांच्यावर पक्ष न बघता, कारवाई करावी अशी विनंती आपण मुख्यमंत्र्यांकडे केली आहे, मात्र पुरावे नसतांना कोणावरही, आरोप करणं योग्य नाही, आरोप करणाऱ्यांकडे पुरावे असतील, तर ते त्यांनी तपास यंत्रणांना द्यावेत, असं अजित पवार म्हणाले. पवार यांनी आज पुण्यातल्या प्रलंबित विकास कामांचा आढावा घेतला.

**एचएमपीव्ही**

एचएमपीव्ही विषाणू नवीन नाही; त्याबाबत नागरिकांनी घाबरून न जाता काळजी घ्यावी तसंच आरोग्य विभागाच्या सूचनांचं पालन करावं, असं आवाहन पुण्याचे जिल्हाधिकारी जितेन्द्र डुडी यांनी केलं आहे.

एचएमपीव्ही विषाणूच्या अनुषंगाने झालेल्या आढावा बैठकीत ते आज बोलत होते. जिल्ह्यातील वरिष्ठ आरोग्य अधिकारी यावेळी उपस्थित होते.

**पुरस्कार**
पुण्यातील गिरीप्रेमी संस्थेचे ज्येष्ठ गिर्यारोहक उमेश झिरपे यांना 2023 चा मानाचा तेनजिंग नॉर्गे राष्ट्रीय साहस जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. येत्या 17 जानेवारीला दिल्लीमध्ये राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान केला जाईल. साहसी क्रीडा क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो.

**संविधान सन्मान दौड**
भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समितीच्या वतीने 'संविधान सन्मान दौड 2025'चं आयोजन पुण्यात करण्यात आलं आहे. येत्या 25 जानेवारी रोजी ही स्पर्धा होणार असून स्पर्धकांची नावनोंदणी सुरू झाल्याची माहिती मुख्य आयोजकांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. 25 जानेवारीला पहाटे 5 वाजता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या खाशाबा जाधव क्रीडा संकुलातून स्पर्धा सुरू होईल.

**मिळकत कर**
सौर ऊर्जा संयंत्र, जलपुनर्भरण यंत्रणा आणि गांडुळ खत प्रकल्प राबवणाऱ्या मिळकतींना यापूर्वी मिळकत करामध्ये दिली जाणारी पाच ते दहा टक्के सवलत यापुढेही कायम राहाणार आहे. संबधित मिळकतधारकांनी पुणे महापालिकेकडे पुन्हा अर्ज करू नये; केवळ नव्याने ही सवलत घेऊ इच्छिणाऱ्या मिळकत धारकांनीच, सवलत मिळावी यासाठी 15 फेब्रुवारीपर्यंत महापालिकेकडे अर्ज करावेत, असं स्पष्टीकरण मिळकतकर विभागाचे प्रमुख माधव जगताप यांनी केलं आहे. हे सर्व प्रकल्प राबवणाऱ्या जुन्या आणि नव्या सर्वच मिळकतधारकांनी अर्ज करावेत असं आवाहन मिळकत कर विभागाने नुकतंच जाहिरातीद्वारे केलं होतं.

**पूरस्थिती**
पूरस्थिती रोखण्यासाठी पुणे महापालिका नदीपात्रातील जुने बंधारे काढणार आहे. पावसाळ्यात खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग केल्यानंतर सिंहगड रस्ता परिसरासह पुण्याच्या काही भागात पूरपरिस्थिती निर्माण झाली होती. शहरातील नदीपात्रात अनेक ठिकाणी जुने, कालबाह्य बंधारे आहेत. त्यांचा आता वापर होत नाही, त्यामुळे गाळ साठला जातो आणि धरणातून पाणी सोडल्यानंतर पूरस्थिती निर्माण होते. त्यामुळे महापालिका हे बंधारे काढून टाकणार आहे. या संदर्भात जलसंपदा विभागाशी चर्चा केली जाईल, असं महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी. यांनी सांगितलं.

**स्वच्छता**

पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने वाकड गावठाण घाट इथं "रिव्हर प्लॉगेथॉन" स्वच्छता मोहिमेचं आयोजन करण्यात आलं होतं. या मोहिमेत अंदाजे 3 ते 4 टन कचरा गोळा करण्यात आला.

**वंदे मातरम्**

वंदे मातरम् हे केवळ गीत नाही, तर स्वातंत्र्य युद्धाच्या काळातील तो मंत्र होता, असं प्रतिपादन प्रसिद्ध लेखक अभिजित जोग यांनी केलं. वंदे मातरम् या गीताच्या निर्मितीला 150वर्षे होत आहेत, त्यानिमित्तानं वंदे मातरम्चे अभ्यासक, लेखक, चित्रकार मिलिंद सबनीस यांनी लिहिलेल्या ‘कहाणी वन्दे मातरम्’ची या पुस्तकाचं प्रकाशन नुकतंच पुण्यात झालं; तयावेळी जोग बोलत होते.

**मांजा**

बंदी असलेल्या नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या एका महिलेला धानोरीमधून पोलिसांनी अटक केली आहे. तिच्याकडून 1600 रुपये किमतीचा मांजा जप्त करण्यात आला आहे. दरम्यान पुण्यातल्या टिळक रस्त्यावरील न्यू इंग्लिश स्कूल इथं 'नायलॉन मांजा वापरू नका' या अभियाना अंतर्गत आज नायलॉन मांजाची होळी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध उद्बोधक घोष फलक हातात घेऊन घातक मांजा विरोधी घोषणा दिल्या.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज 10 पूर्णांक 9 दशांश सेल्सियस किमान तापमान नोंदवलं गेलं. उद्या किमान 12 अंश तर कमाल 31 अंश सेल्सियस तापमान  राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, संध्याकाळी सहा वाजता, नमस्कार.**